ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६
राज्य आयोगाच्या अध्यक्षांच्या
नियुक्तीबाबत
माजी मा.न्या.श्री.ए.पी. भंगाळे

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१४५ (सुधा १)/ ग्रासं. ४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ०६जानेवारी, २०१६

वाचा : शा.नि., अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्र.ग्रासंक-२०१३/प्र.क्र.११७/ग्रासं ४, दि.३.९.२०१३

शासन निर्णय :

ग्राहक संरक्षण अधिनियम ,१९८६ अंतर्गत ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी राज्यात, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग कार्यान्वित करण्यात आला आहे. या आयोगाच्या अध्यक्षपदी माजी न्या.श्री. आर.सी.चव्हाण यांची दि.३.९.२०१३ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती. माजी न्या.श्री. आर.सी.चव्हाण यांनी अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग या पदाचा राजीनामा दिला असून त्यांचा राजीनामा दि.५.१२.२०१५ पासून मंजूर करण्यात आला आहे. ग्राहक संरक्षण कायाद्याच्या कलम १६ (१) (ए) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून शासन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षपदी माजी मा.न्या.श्री.ए.पी. भंगाळे यांची नियुक्ती करीत आहे. माजी मा.न्या.श्री.ए.पी. भंगाळे यांची नियुक्ती पुढील शर्तींच्या अधीन राहील.

१ राज्य आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्ती ५ वर्षासाठी किंवा त्यांच्या वयाच्या ६७ वर्षे पूर्ण होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यतच राहील.

२ वरील मुदत संपल्यानंतर त्यांची राज्य आयोगावर पुनर्नियुक्ती करता येणार नाही.

३ त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

४ त्यांना राज्य आयोगाच्या अध्यक्षांना ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्राहक संरक्षण नियम,२००० च्या नियम-७ मधील तरतुदी लागू राहतील.

२. मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांना खालील सोयीसुविधा देय राहतील.

१ राज्य आयोगाच्या अध्यक्षांना विनाभाडे तत्वावर निवासस्थान किंवा दरमहा रू.१०,०००/(रूपये दहा हजार) घरभाडे भत्ता.

२ राज्य आयोगाच्या अध्यक्षांना आतिथ्य भत्ता दरमहा रू.१२,०००/- (रूपये बारा हजार)

३ राज्य आयोगाच्या अध्यक्षांना निवासस्थानी कार्यालयीन वापराकरिता एस.टी.डी./इंटरनेट सुविधेसह दूरध्वनी तसेच दरमहा रू.१०,०००/- पर्यत विनाशुल्क कॉल्स अनुज्ञेय राहतील. यात मोबाईल सेवेचा समावेश राहील.

४ राज्य आयोगाच्या अध्यक्षांना दरमहा र.३५००/ (रूपये तीन हजार पाचशे फक्त) प्रमाणे निवासी शिपाई भत्ता.

५ राज्य आयोगाच्या अध्यक्षांना शासकीय कार्यालयीन वाहन, वाहन चालकासह उपलब्ध करून देता येईल व दरमहा २०० लिटर पेट्रोल किंवा प्रत्यक्षात वापरलेले पेट्रोल यापैकी जे कमी असेल त्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल. शासकीय वाहनाऐवजी जर अध्यक्ष कार्यालयीन कामकाजासाठी स्वत:च्या वाहनाचा वापर करणार असतील तर नियुक्तीच्या दिनांकापासून दरमहा रूपये २४,३००/- (रूपये चोवीस हजार तीनशे फक्त) या दराने वाहनभत्ता .

६ अध्यक्षांना तीन दैनिक वृत्तपत्रे व तीन मासिके खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती.

७ उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना लागू असलेले प्रवास भत्ते नियम, १९५६ नुसार त्यांना प्रवासभत्ता व सवलती.

८ वैद्यकीय खर्चाची नियमानुसार प्रतिपूर्ती

९ निवासस्थानी होत असलेल्या विद्युत वापराविषयी दरमहा प्रत्यक्ष होणारा खर्च किंवा दरमहा ८३३ युनिट्स यापैकी जो खर्च कमी असेल अशा खर्चाची प्रतिपूर्ती प्रत्यक्ष ताबा घेतल्याच्या दिनांकापासून देय राहील.

१० राज्य आयोगाच्या अध्यक्षांना निवासस्थानासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा खर्च.

११ मा.उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नियम,१९५६ च्या नियम-२ ब नुसार मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे अधिकृत निवासस्थान विनाभाडे तत्वावर (इलेक्ट्रीक संचाच्या फिटींगसह) फर्निचरसह उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच सदरच्या फर्निचर दुरूस्ती व देखभाल यासाठी वार्षिक रू.२५,०००/- (रूपये पंचवीस हजार फक्त) पर्यत तरतुद राहील.

३. उपरोक्त बाबीसाठी होणारा खर्च मागणी क्र. एम-१" २४०८-अन्न साठवण व वखार साठवण- (०४) (००) ग्राहक सरंक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य ग्राहक संरक्षण परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (०४) (०१) मुंबई शहर (२४०८ ०२५१) " या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुभाष लाखे) ५/९/२०१६
सह सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रति,
माजी मा.न्या.श्री.ए.पी. भंगाळे
फ्लॅट क्र. ३ तिसरा मजला
क्रिएशन व्हिला प्लॅाट नं.२१२,
कार्पोरेशन मैदानाजवळ
रामनगर, नागपूर-४४० ०१०.

प्रतिलिपी,
१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
४) मा.राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
५) अध्यक्ष, राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती, मुंबई

६) महाराष्ट्रातील सर्व लोकसभा व राज्यसभा सदस्य,
७) महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद सर्व सदस्य,
८) सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई,
९) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई,
१०) वित्त विभाग, व्यय-४,मंत्रालय, मुंबई
११) सर्व मंत्रालयीन विभाग,
१२) महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), १/२, मुंबई/नागपूर, महाराष्ट्र
१३) महालेखापाल- (लेखापरिक्षा) १/२ ,मुंबई/नागपूर, महाराष्ट्र
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१६) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई
१७) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
१८) मा.रजिस्टार जनरल, उच्च न्यायालय, मुंबई *
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई, *
२०) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई, *
२१) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद,
२२) सर्व विभागीय आयुक्त,
२३) सर्व जिल्हाधिकारी,
२४) प्रबंधक (विधी), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई,
२५) परिक्रमा खंडपीठ नागपूर/औरंगाबाद,
२६) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच (सर्व),
२७) निवडनस्ती/ ग्रासं ४